# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ कार्यासन दुरध्वनी क्रमांक: ०७१२-६४६५
E-mail:ronagpur@dtemaharashtra.gov.in Website:www.rdtenagpur.org.in

क्रमांक:तंशिसं/विकाना/आस्था-२/२०१९/318
दिनांक :- 19 JAN 2019

प्रति,
प्राचार्य,
१)शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर, आर्वी, ब्रम्हपुरी,
साकोली, गोंदीया, गडचिरोली
२) शासकीय हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, नागपूर
३) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर, नागपूर
४) सर्व अनुदानित संस्था
५)सर्व विनानुदानित संस्था

विषय :- दि. २६ जानेवारी , २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याबाबत केलेल्या नियोजनाचा / तयारीचा अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ :- मा. विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. एमयुएन१९(३)/"लोकशाही पंधरवडा"/कवि-०१९/२०१९, दि. १९/०१/२०१९

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेमार्फत दि. २६ जानेवारी , २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करावयाचा आहे. तरी या कालावधीत करावयाच्या कार्यक्रम व कृतीबाबत आपणांस सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रत्येक आठवडयात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल ठराविक एखाद्या पुराव्यासह या कार्यालयास सादर करण्याबाबत यापुर्वी आपणांस सुचित करण्यात आलेले आहे.

तरी लोकशाही पंधरवडा साजरा करण्याच्या दृष्टीकोणातुन करण्यात आलेल्या तयारीबाबतचा / कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

(गुलाबराव ठाकरे)
(सहसंचालक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ | कार्यासन दुरध्वनी क्रमांक: ०७१२-६४६५

E-mail:ronagpur@dtemaharashtra.gov.in | Website:www.rdtenagpur.org.in


क्रमांक:तंशिसं/विकाना/आस्था-२/२०१८/ 150

दिनांक :- 8 JAN 2019

प्रति,

प्राचार्य,

१)शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर, आर्वी, ब्रम्हपुरी,
साकोली, गोंदीया, गडचिरोली

२) शासकीय हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, नागपूर

३) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर, नागपूर

४) सर्व अनुदानित संस्था

५)सर्व विनानुदानित संस्था

विषय :- दि. २६ जानेवारी , २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/आस्था-२/२०१८/१५, दिनांक २१/०१/२०१९

या कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये दि. २६ जानेवारी , २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत संस्थास्तरावर "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याबाबत तसेच जबाबदार अधिकाऱ्यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याच्या दृष्टीने संस्थास्तरावर प्राचार्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणुक याव्दारे करण्यात येत आहे.

तसेच, सहपत्रित करण्यात आलेल्या तपशीलाप्रमाणे याविषयी करावयाच्या पुर्वतयारीच्या कार्यवाहीचे मुद्दे जोडण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(गुलाबराव ठाकरे)

(सहसंचालक)

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

## दिनांक २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याच्या दृष्टीने संस्थेकडून करावयाच्या कार्यवाहीचे मुद्दे

१. संस्थेतील प्रवेशित पात्र (१८ वर्षावरील) १०० टक्के विद्यार्थ्यांचे नाव मतदार यादीत नोंदविण्यासाठी कार्यवाही करणे.
२. मतदार यादीत नाव असलेल्या व नसलेल्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र यादी तयार करणे.
३. मतदार यादीत नाव नसलेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनीचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्याविषयी कार्यवाही करणे. मतदार यादीत नाव नोंदविण्याचे फॉर्म निवडणूक यंत्रनेकडून प्राप्त करुन विद्यार्थ्यांना पुरविणे. जिल्हा निवडणूक कार्यालयाशी समन्वय साधुन महाविद्यालयाच्या परिसरातच अशा विद्यार्थ्यांकडून मतदार नोंदणी फॉर्म गोळा करण्यासाठी कक्ष उभारणे यासाठी नोडल अधिकारी नेमणे.
४. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून शाळेच्या कंम्पाउंड भिंतीवर, मुख्य मार्गीका यावर मतदान जागृती बाबत आकर्षक सचित्र संदेश रंगविणे.
५. "लोकशाही निवडणूक व सुशासन" या विषयाचे संस्थेत बॅनर्स लावण्यात यावे. जिंगल्स / घोषवाक्य / एसएमएस तयार करुन २६ जोनवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत प्रसारीत करणे. उदा. i) "जागरुक नागरीक मी भारताचा .... हक्क बजाविण मतदानाचा." ii) "माझा देश माझी लोकशाही ........ टिकविण ती लावून बोटाला शाई." iii) "वयाची १८ वर्ष पुर्ण झालीत ना ? मग वाट कशाची त्वरा करा मतदार यादीत नाव नोंदवा." iv) "माझे मत माझा अधिकार , मी मतदार यादीत नाव नोंदविले, तुम्हीही नोंदवा, लाकशाही बळकट करा."
६. २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनी हा लोकशाही सोहळा असून त्या दिवशी प्रमुख वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीतकमी ३-४ वाक्य अंतर्भुत करावी.
७. आपल्या कार्यक्षेत्रातील स्वयंमसेवी संस्था उदा. लॉयन्स क्लब रोटरी क्लब / एनजीओ / मौलाना यांच्या सहकार्याने मतदार जागृती मोहीम राबविणे.
८. मतदार यादीत महिलांची टक्केवारी वाढविण्यासाठी समुपदेशन करणे.
९. चर्चासत्र आयोजीत करणे / पोस्टर्स स्पर्धेत सहभाग घेणे व यात सहभागी प्रत्येकाला मनपा / नपा तर्फे सहभाग प्रमाणपत्र मिळणेसाठी पाठपुरावा करणे.
१०. महाविद्यालयामध्ये मतदार नोंदणी माहिमेच्या वेळी पहील्या शंभर विद्यार्थ्यांना जिल्हाविधकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र, उपजिल्हा निवडणूक अधिकारी व तत्सम अधिकारी यांचेमार्फत प्रदान करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही.